Con 751

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका एक — विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२०

[**वेळ** : सकाळी १०-३० ते दुपारी १-१५]

**(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**

(**एकूण गुण** — १००)

---

**सूचना.**— (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा **पूर्ण गुण** मिळणार नाहीत.

(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करू नये.

**गुण**

१. खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर सुमारे २० ते २५ ओळींत लिहा :— **१०**

(अ) वजन कमी करण्यासाठी पंतांनी काय काय केले हे ‘ उपास ’ या पाठाच्या आधारे लिहा.

(ब) ‘ माझ्या जीवनातील शिक्षकाचे स्थान ’ या विषयावर तुमचे विचार लिहा.

२. पाठांच्या आधारे खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे सुमारे १० ते १५ ओळींत लिहा :— **२५**

(अ) लेखकाने दिलेल्या शालीचा उपयोग भिक्षेकऱ्याने कशा पद्धतीने केला ?

(ब) बार्कमध्ये इंजिनिअर म्हणून जॉईन झाल्यानंतर डॉ. अनिल काकोडकरांना कोणता अनुभव आला ?

(क) तपोवनात अब्दुलमियांचा सत्कार करण्याचे का ठरविण्यात आले ?

(ड) ‘ मी माझ्या मुलाला खूप शिकवीन ’ असे डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या आईने का ठरविले ?

(इ) ‘ वाघीण आणि तिच्या पिल्लांची भेट ’ या प्रसंगाचे वर्णन करा.

(फ) सग्वारो कॅक्टस बद्दलची माहिती लिहा.

३. कवितांच्या आधारे खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे सुमारे १० ते १५ ओळींत लिहा :— **१५**

(अ) ‘ दोन दिवस ’ या कवितेत कवी नारायण सुर्वे यांनी केलेले वास्तव जीवनाचे चित्रण तुमच्या शब्दांत लिहा.

(ब) देशाच्या सरहद्दीवर राहून देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांसाठी तुम्हाला काय करावेसे वाटते ते लिहा.

(क) ‘ रंग मजेचे रंग उद्याचे ’ या कवितेत कवयित्रीने पृथ्वीला वाचवण्यासाठी काय काय करायला सांगितले आहे ?

(ड) ‘ झाडांचे मानवी जीवनातील स्थान ’ या विषयी तुमचे विचार लिहा.

४. खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा :— **१०**

(अ) अंगाचा तिळपापड होणे (ब) सुरूंग लावणे

(क) हातभार लावणे (ड) भारावून जाणे

(इ) ऋण असणे (फ) झोकून देणे.

[ उलटून पहा

गुण

५. खालील मराठी शब्दसमूह आणि त्यांचे इंग्रजी अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा :— १०

| गट 'अ' | गट 'ब' |
| --- | --- |
| (अ) शैक्षणिक अर्हता | (१) Official Record |
| (ब) नैमित्तिक रजा | (२) Government Letter |
| (क) वैद्यकीय तपासणी | (३) Registered Letter |
| (ड) द्रुतगती महामार्ग | (४) Bonafide Certificate |
| (इ) वृत्तसंस्था | (५) General Meeting |
| (फ) सर्वसाधारण सभा | (६) News Agency |
| (ग) शासकीय पत्र | (७) Express Highway |
| (ह) वास्तविकता प्रमाणपत्र | (८) Medical Examination |
| (य) कार्यालयीन अभिलेख | (९) Casual Leave |
| (र) नोंदणीकृत पत्र | (१०) Academic Qualification. |

६. (अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचे लिंग बदला :— ५

(१) गाय (२) मुलगा

(३) वाघीण (४) चिमणा

(५) स्त्री (६) विद्यार्थी

(ब) खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :— ५

(१) थंड (२) अंधार

(३) पास (४) अन्याय

(५) सत्य (६) लहान.

७. (अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्यांतील विशेषण ओळखा :— ५

(१) आज आकाश निरभ्र आहे.

(२) श्रावण महिन्यात रिमझिम पाऊस पडत असतो.

(३) कॅक्टसच्या झाडात रसदार गर असतो.

(४) सकाळच्या प्रसन्न वातावरणात अभ्यास चांगला होतो.

(५) प्रत्येकाने उत्तम नागरिक बनण्याचा प्रयत्न करावा.

(६) त्या संध्याकाळी सोसाट्याचा वारा सुटला होता.

(ब) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये पुन्हा लिहा :— ५

(१) मुलांना लाडू आवडतो (प्रश्नार्थी वाक्य तयार करा).

(२) तो रोज व्यायाम करतो का ? (विधानार्थी वाक्य तयार करा).

(३) नेहमी खरे बोलावे (नकारार्थी वाक्य तयार करा).

(४) मुलांनी रांगेत चालायला हवे (आज्ञार्थी वाक्य तयार करा).

(५) तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे (काळ ओळखा).

गुण

८. कंसात दिलेल्या पर्यायांमधून वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द समूहाची निवड करा :— १०

(श्रीफळ, वाघीण, जीवनसृष्टी, पन्नासपौंड, कलाकृती,
कार्बन, बिनसाखरेचा, अणुसंशोधनाचा, सुर्यकिरणांची, चुडीवाल्याची)

(अ) "दोन महिन्यांत ........................ वजन कमी करून दाखवीन !"

(ब) नारायण सुर्वे यांना प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व ........................ मिळत राही.

(क) डॉ. होमी भाभा यांनी भारतातील ........................ पाया घातला.

(ड) संक्रांतीला आणि ज्येष्ठ पौर्णिमेला तपोवनातील स्त्रिया ........................ आतुरतेने वाट पाहत असत.

(इ) आपल्या पायाला चिकटलेला हा ........................ आपल्याला धुवायला हवा.

(फ) भिंगाच्या सहाय्याने ........................ शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो.

(ग) मूळ कथा दर्जेदार असल्याशिवाय कोणतीही ........................ उत्तम होऊ शकत नाही.

(ह) ........................ रात्रीच पिल्लांना नाल्याकाठच्या जांभळीच्या दाट झुडुपात लपवून शिकारीसाठी गेली होती.

(य) वाळवंटातली ........................ हा खरोखर पृथ्वीवरचा एक चमत्कार आहे.

(र) साखरेत सर्वात अधिक कॅलरीज असतात, म्हणून प्रथम ........................ चहा सुरू केला.

CON 753

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद

रविवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२०

[**वेळ** : दुपारी १-४५ ते सायंकाळी ४-१५]

(**एकूण गुण** — १००)

---

**सूचना.**— (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा **पूर्ण गुण** दिले जाणार नाहीत.

(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करू नये.

**गुण**

१. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे २० ओळींत निबंध लिहा :— **२०**

(अ) कोरोना महामारी : एक संकट

(ब) खेड्यांच्या विकासाची गरज.

२. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयाच्या संदर्भात सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार लिहा :— **२०**

(अ) कुटुंबातील स्त्रीचे स्थान ;

(ब) वाढत्या प्रदुषणावरील उपाय.

३. खालीलपैकी कोणत्याही **दोन** बाबी तयार करा :— **३०**

(अ) मुलीचा अमेरीकेतील उच्चशिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीतून ना-परतावा आगाऊ रक्कम मिळण्यासाठीचा अर्ज व त्यावरील टिप्पणी तयार करा.

(ब) राज्यातील अपंगांना अपंगत्वाचे ऑनलाईन प्रमाणपत्र वितरण करण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे नमूद करणारे परिपत्रक तयार करा.

(क) महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमध्ये सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरिता शुल्क वाढ न करण्याबाबतचे शासनाचे परिपत्रक तयार करा.

[उलटून पहा

गुण

४. खालील मराठी शब्दसमूह आणि त्यांचे इंग्रजी अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा :— १०

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| (अ) Finance Department | (१) अपर जिल्हाधिकारी |
| (ब) Animal Husbandry | (२) उद्योग आयुक्त |
| (क) Agriculture and Co-operation | (३) अधिदान व लेखा अधिकारी |
| (ड) Additional Collector | (४) औषधांचा खर्च |
| (इ) Revenue Department | (५) कृषि व सहकार |
| (फ) Industries Commissioner | (६) पशुसंवर्धन |
| (ग) Pay and Accounts Officer | (७) महसूल विभाग |
| (ह) Resolution of Government | (८) वित्त विभाग |
| (य) Director of Education | (९) शासन निर्णय |
| (र) Expenditure on Medicines | (१०) शिक्षण संचालक. |

५. पुढील वाक्यप्रयोगासाठी मराठी पर्याय द्या (कोणतेही **पाच**) :— ५

(अ) To take up

(ब) To solve

(क) To respect

(ड) To resume duty

(इ) To bring to notice

(फ) To recover from illness.

६. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :— १५

If Ramanujan had been better educated, he would have been even more wonderful than he was. In fact Hardy was obliged to teach him some formal mathematics as though Ramanujan had been a scholarship candidate at Winchester. Hardy said that this was the most singular experience of his life. What did modern mathematics look like to someone who had the deepest insight, but who had literally never heard of most of it ?

It is good to remember that England gave Ramanujan such honours as were possible. The Royal Society elected him **a Fellow** at the age of thirty (which, even for a mathematician, is very young). Trinity also elected him a Fellow in the same year. He was the first Indian to be given either of these distinctions. He was amiably grateful. But he soon became ill.